# फायर सेफ्टी कॉन्क्लेव्हचे आयोजन

फायर सेफ्टीविषयी वाढत असलेली काळजी लक्षात घेऊन, गोदरेजने फायर सेफ्टीविषयी चर्चा करण्यासाठी परिसंवादाचे आयोजन केले होते. तसेच, आग लागण्यास प्रतिबंध करणे व त्याचा प्रतिकूल परिणाम इमारतीवर होणे रोखणे, यावरही जागृती करण्यात आली. परिसंवादामध्ये सहभागी झालेले प्रमुख पाहुणे होते, मेहेरनोश पिठावाला, व्हीपी व ग्लोबल हेड, गोदरेज सिक्युरिटी सोल्यूशन्स अँड सिस्टीम्स; के. शामी, फायर अडव्हॉयजर, केंद्र सरकाररचे गृह मंत्रालय; मेजर जनरल सोली पावरी, माजी सुरक्षा सल्लागार, भारतीय रिझर्व्ह बँक; बुरझिन सरभनवाला, वरिष्ठ जोखीम व्यवस्थापन तज्ज्ञ, आयसीआयसीआय जनरल इन्शुरन्स; विनायक साने, फायर सिक्युरिटीवरील सीनिअर कन्सल्टंट; कॅप्टन कानन, मुख्य सुरक्षा अधिकारी, सेंट्रल बँक; संदीप मालवी, उपायुक्त, ठाणे; बीआयएसमधील वरिष्ठ कार्यकारी; एस. बी. खरबडे, डेप्युटी चीफ फायर ऑफिसर, मुंबई अग्निशमन दल.

अलीकडच्या काळात देशात विविध ठिकाणी आगी लागण्याच्या घटना अनेक घडल्या आणि अशा घटनांचे प्रमाण सर्वाधिक असण्याच्या शहरांच्या यादीत मुंबई आघाडीच्या शहरांपैकी एक आहे. कमला मिल्समधील घटनेनंतर, अनेक व्यावसायिक इमारती, रेस्तराँ, बार आदींनी अद्याप फायर



सेफ्टीची दक्षता घेतलेली नाही व त्यासाठी आवश्यक उपाय योजलेले नाहीत. मुंबई अग्निशमन दलाने स्टार हॉटेल, लोकप्रिय पब, रेस्टो-बार व क्लब, जिमखाना असलेल्या अशा ५६६ इमारतींची पाहणी केली आणि त्यातील जवळजवळ ९० टक्के इमारतींनी फायर सेफ्टी नियमांचे पालन केले नसल्याचे आढळले. नियमांचे पालन न करणाऱ्यांना महाराष्ट्र फायर सेफ्टी अँड लाइफ प्रिव्हेन्शन ॲक्ट २००६ या नुसार नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत.

आगीपासून सुरक्षित इमारत कशी निर्माण करावी, याविषयी माहिती देणे, हे या परिसंवादाचे उद्दिष्ट होते. #Securespaces याविषयीच्या चर्चेने उपस्थितांना एखाद्या ठिकाणी आग लागल्यास माहितीच्या अधिकाराचा वापर कसा करता येऊ शकतो, सुरक्षा उपयांविषयीचे पूर्वग्रह दूर करणे, स्मार्ट सुरक्षेसाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे, फायर एस्केप याची माहिती मिळाली.

भारतात गेल्या दशकात फायर सेफ्टीविषयी जागरूकता प्रचंड वाढली आहे. आयटी व रिटेल मार्केट झपाट्याने विस्तार करत असल्याने व मोठे व्यावसायिक कारखाने उभारण्याचे प्रमाणही वाढले असल्याने त्यासाठी आवश्यक असलेली मालमत्ता, गुणवत्ता व संसाधने विचारात घेता आग व सुरक्षितता याबाबत जोखीम घेणे धोकादायक ठरते. तसेच, निवासी क्षेत्राच्या विकासातही आगीच्या अनेक घटना घडल्या आहेत. यामुळे पायाभूत सुविधा विकसित करताना व प्रामुख्याने स्मार्ट सिटी मिशन यासारखे उपक्रम राबवत असताना फायर सेफ्टी व सुरक्षा यांची काळजी घेण्याची मागणी सातत्याने वाढत आहे. गोदरेज सिक्युरिटी सोल्यूशन्सचे बी२बी बिझनेसचे उपाध्यक्ष व परिसंवादातील एक सहभागी पुष्कर गोखले यांनी फायर प्रोटेक्टिंग रेकॉर्ड कॅबिनेटसारख्या सुरक्षा उपकरणांचा अवलंब, आगीशी संबंधित घटनांचा सामना करण्याची तयारी करण्यासाठी आगीची सूचना देणारी प्रगत व्यवस्था बसवणे, यांचे महत्त्व स्पष्ट केले.